सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal . No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १८३ | गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




अमळनेर : पेट्रोल पंपावर वाहनचालकांची झालेली प्रचंड गर्दी. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# पेट्रोल तुटवड्याच्या अफवेने वाहनधारक 'पॅनिक'

## पेट्रोल पंपांवर गर्दी; संयम ठेवण्याचे प्रशासनाचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आखाती देशांतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. मात्र, इंधन पुरवठा पूर्णपणे बंद झालेला नाही. असे असले तरी येथे व परिसरात पेट्रोलचा तुटवडा असल्याच्या अफवेने वाहनचालक 'पॅनिक' झाले आहेत. पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या आहेत. परिणामी काही पेट्रोल पंप चालकांनी गर्दीमुळे बुधवार, दि. २५ मार्च रोजी पेट्रोल पंप बंद ठेवले आहेत. मात्र, वाहनचालकांनी संयम बाळगावा. पेट्रोलचा पुरवठा सुरळीत आहे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

प्रत्यक्षात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असतानाही नागरिकांनी घाईघाईने पेट्रोल- डिझेल भरण्यास सुरुवात केल्याने मागणीत अचानक चौपट वाढ झाली. परिणामी काही पेट्रोल पंपांवरील साठा तात्पुरता संपल्याची परिस्थिती निर्माण झाली. ज्यांना तातडीची गरज नव्हती, त्यांनीही वाहनांच्या टाक्या फुल करून घेतल्या. तसेच कॅनमध्ये इंधन साठवण्यास सुरुवात केल्याने ही परिस्थिती अधिकच गंभीर झाली.

> “ लोकांमध्ये पेट्रोल- डिझेल मिळेल की नाही, अशी शंका निर्माण झाली असली तरी प्रत्यक्षात पुरवठा सुरळीत सुरू आहे. मात्र, काही नागरिक भीतीपोटी जास्त प्रमाणात पेट्रोल खरेदी करत आहेत. त्यामुळे जेवढे पेट्रोल दिवसभरात सुमारे दोन हजार लोकांना पुरवठा होऊ शकते, ते केवळ पाचशे ते सातशे लोकच घेऊन जात आहेत. पंपांवर वाहनांची लांबच लांब रांग लागल्यामुळे टँकर उशिरा भरले जात आहेत. शासनाच्या नियमानुसार तसेच सूचनेनुसार बाटली किंवा कॅनमध्ये पेट्रोल देता येत नाही.
>
> **लालचंद सैनानी,** पेट्रोल पंपचालक, अमळनेर.

बुधवारी सकाळी शहरातील सर्वच पेट्रोल पंप बंद होते. त्यामुळे चोपडा रस्त्याकडील पेट्रोल पंपांवर

पान २ वर

# गॅस सिलिंडर बूकिंगचे नवीन नियम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गॅसचा काळा बाजार रोखण्यासाठी आणि सर्वसामान्यांपर्यंत गॅसचा पुरवठा सुरळित करण्यासाठी आता २ सिलिंडरमधील प्रतिक्षावेळ वाढविण्यात आला आहे. एक सिलिंडर असलेले ग्राहक २५ दिवस, २ सिलिंडर ३५ दिवस व उज्वला योजना लाभार्थी ४५ दिवस करण्यात आला आहे.

जर ठराविक वेळे आधी बूकिंग करण्याचा प्रयत्न केला तर सिस्टीम तुमचे बूकिंग स्विकारणार नाही. तसेच ५ किलो सिलिंडर बुकिंगसाठी ९ ते १६ दिवसांचा कालावधी, तर १० किलोसाठी १८ ते ३२ दिवसांचे अंतर असणे अनिवार्य आहे.










## संपादकीय



# सीमेवरील युद्धकळा

गेल्या आठवड्यातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मोदी यांचे भाषण देशापुढील काही अपरिहार्यतेची जाणीव करतानाच काही नव्या दिशेचे सूचनही करते. अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाबाबत भारताची नेमकी भूमिका काय? या प्रश्नाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर संसदेतील भाषणाद्वारे उत्तर दिले आहे. त्याचबरोबर या युद्धामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचीही जाणीवही देशवासीयांना करून दिली आहे. युद्ध सुरू होऊन तीन आठवड्यांहून अधिक दिवस झाले असून, ती थांबण्याची चिन्हे नाहीत; उलट त्याची व्याप्ती वाढते आहे. परस्परांना धडा शिकविण्यासाठी दोन्ही बाजूंकडून युद्धाची तीव्रता अशीच वाढत राहिल्यास अभूतपूर्व स्थितीला सामोरे जावे लागणार आहे. या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवा, हा पंतप्रधानांच्या भाषणाचा मथितार्थ. युद्ध सुरू झाल्यापासून भारताने कळीच्या विषयांवर मौन बाळगल्याची टीका विरोधी पक्षांकडून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर मोदी यांनी संसदेच्या व्यासपीठावरून सद्यस्थितीवर भाष्य केले आहे. पंतप्रधानांच्या भाषणामध्ये गेले काही दिवस सुरू असलेल्या संघर्षाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली; तसेच पश्चिम आशियातील देशांच्या प्रमुखांशी केलेल्या चर्चेबाबत माहिती दिली. तणाव कमी करण्याचा आणि संघर्ष संपवण्याचा आग्रह भारताने पूर्वीपासूनच धरला आहे. संघर्षग्रस्त देशांमधील सुमारे एक कोटी भारतीय आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेवर त्यांनी भर दिलाच. त्यासोबत ऊर्जाकेंद्रे आणि व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांना त्यांनी विरोध केला, त्यामागे भारताची ऊर्जासुरक्षा हा मुद्दा सर्वांत कळीचा आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने भारतासह अन्य आशियाई देशांच्या इंधनपुरवठ्यात खंड पडला आहे. त्यामुळे विशेषतः इंधनवाहक जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी प्रयत्न, ही काळाची गरज आहे.

होर्मुझमधून तेलवाहक जहाजांना सुरक्षितता पुरवण्यात अमेरिकादी देशांना यश आलेले नाही. त्यामुळेच सध्या तरी इराणशी चर्चेवर भर देणे शहाणपणाचे आहे. युद्धस्थितीच्या परिणामांचा आणि त्या आघाडीवरील सद्यस्थितीचाही मोदी यांनी आपल्या भाषणात आढावा घेतला. विशेषतः देशाच्या गरजेपैकी साठ टक्के द्रवरूप वायूच्या आयातीमध्ये युद्धामुळे मोठी घट झाली आहे. देशात कच्च्या तेलाचा ५३ लाख टन साठा असून, तो ६५ लाख टनांपर्यंत नेण्याचे प्रयत्न, तेलशुद्धीकरणाच्या क्षमतेतील वाढ, आयातीमधील विविधीकरण, पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण, शाश्वत उर्जास्रोतांच्या पर्यायांबाबत उपाययोजना आणि जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राजनैतिक प्रयत्न यांबाबत सरकार उचलत असलेल्या पावलांची त्यांनी माहिती दिली. 'कोरोना'तील संकटाची आठवण करून देत मोदी यांनी युद्ध लांबल्यास काय स्थिती होऊ शकते, याविषयी इशाराही दिला आहे. त्या काळात विस्कळित झालेली पुरवठा साखळी अजूनही पूर्वपदावर येऊ शकलेली नाही; याची जाणीव ठेवून साऱ्या यंत्रणेने युद्धपातळीवर काम करण्याची गरज आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत असल्याची ग्वाही मोदी यांनी दिली असली, तरी सध्या गॅसअभावी विविध शहरांमध्ये बंद पडण्याच्या मार्गावर असलेला हॉटेल उद्योग आणि ठिकठिकाणी उद्योगांची थंडावलेली चक्रे सद्यस्थिती आणि भविष्यातील वास्तवाची जाणीव करून देत आहेत. या स्थितीचा फायदा घेण्याच्या प्रयत्नांवर भाष्य करून इंधन व गॅसच्या काळ्या बाजाराबाबत सतर्क राहण्याचा त्यांचा इशारा यंत्रणा किती गांभीर्याने घेतात, ते महत्त्वाचे आहे. गेल्या काही दिवसांमध्ये या संवेदनशील विषयावरून विरोधकांनी सरकारवर टीकास्त्र सोडणे आणि सरकारपक्षाकडून विरोधकांनाच जबाबदार धरण्याचे प्रकार घडले. त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी एकजुटीने या संकटाचा मुकाबला करण्याबाबत केलेले आवाहन सर्वांत महत्त्वाचे आहे. त्यासाठी विरोधकांनी वास्तव समजून घेणे आणि सरकारनेही त्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे. अर्थात, अधिवेशन समाप्त झाल्यावर हे भान कोण बाळगते, हे विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दिसेलच.

# चोपडा- अमळनेर रस्त्यावर अवजड वाहतूक बंद करा

### श्री सप्तशृंगी गडावर पायी जाणाऱ्या भाविकांची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्री सप्तशृंगी गडावर दर्शनासाठी पायी जाणाऱ्या भाविकांची गर्दी वाढली आहे. या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून अपघात टाळण्यासाठी गुरुवार, दि. २६ मार्च व शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी चोपडा- अमळनेर रस्त्यावरील अवजड वाहतूक बंद ठेवावी, अशी मागणी भाविकांनी केली आहे.

याबाबत संकल्प युवा फाऊंडशेनचे अध्यक्ष पंकज शेटे यांनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना नुकतेच निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे, की या कालावधीत मोठ्या संख्येने पदयात्री चोपडा ते अमळनेर मार्गाने श्री सप्तशृंगी गडाकडे प्रस्थान करतात.

या मार्गावर सुरू असलेली अवजड वाहनांची वाहतूक पायी चालणाऱ्या भाविकांच्या सुरक्षिततेसाठी धोकादायक ठरू शकते. भाविकांची मोठी गर्दी असल्यामुळे जड वाहनांना मार्ग काढताना अडचणी निर्माण होतात. परिणामी वाहतूक कोंडी होऊन भाविकांना त्रास सहन करावा लागतो. तसेच रात्रीच्या वेळी व वळणाच्या रस्त्यांवर अपघात होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. त्यामुळे गुरुवार, दि. २६ मार्च रोजी सकाळी ६ वाजेपासून ते शुक्रवार, दि. २७ मार्च रोजी रात्री १२ वाजेपर्यंत चोपडा ते अमळनेर हद्दीत सर्व प्रकारची अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवावी अथवा पर्यायी मार्गाने वळवावी.




अमळनेर : पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना निवेदन देताना संकल्प युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष पंकज शेटे, सदस्य व भाविक.

# अमळनेरात श्रीराम नवमीनिमित्त श्रीराम मंदिरात आज जन्मोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयाजवळील श्रीराम मंदिरात श्रीराम नवमीनिमित्त मंगळवार, दि. २४ मार्च ते गुरुवार, दि. २६ मार्च भजन, कीर्तनाचे, श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले आहे. श्रद्धेय राजीव कृष्णाजी झा महाराज यांच्या अमृत वाणीतून हे कथा निरुपण होत आहे. भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता श्रीराम जन्मोत्सव कथा पार पडली. बुधवार,, दि. २५ मार्च रोजी दुपारी ४ ते सायंकाळी ७ या वेळेतही श्रीराम जन्मोत्सव कथा निरुपण झाले. गुरुवार, दि. २६ मार्च रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत भजनसंध्या पार पडणार आहे. त्यानंतर श्रीराम जन्मोत्सव साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर श्रीमंत प्रताप शेठजी यांचे वारस असलेल्या धुळे येथील



(स्व.) महेश अग्रवाल यांच्या परिवारातर्फे या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीराम नवमीनिमित्त मंदिर परिसरात सुशोभीकरण करण्यात आले आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. २६ मार्च रोजी श्रीराम नवमीच्या दिवशी भाविकांना महाप्रसाद वाटप होणार आहे. सर्व श्रीराम भक्तांनी कार्यक्रम व दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रवाल परिवारातर्फे करण्यात आले आहे.



# सुरेल आवाजाचा दयाळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

## पक्ष्यांची ओळख

**नाव :** दयाळ Robin
**रंग :** दयाळ नर पक्षाची मान,पाठ,पंख चमकदार काळे असतात.पोटावर पांढरी पट्टी असते.मादी पूर्ण राखाडी रंगाची असते.
**चोच :** काळी व टोकदार असते.
**डोळे :** गडद तपकिरी असतात. डोळ्यांच्या खाली व वर पांढरी रेष असते.
**घरटे :** दयाळ मानवी वस्ती जवळ राहतो.मादी गवत,काड्यांचा वापर करून घरटे बांधते.घरटे खोलगट पाच इंच असते.
**अंडी :** मादी एप्रील मे मध्ये तीन चार अंडी घालते.अंड्यांचा रंग फिकट निळा असून त्यावर तपकिरी ठिपके असतात.
**भक्ष :** दयाळ किटक,अळ्या, नाकतोडे खातो.फुलातील रस हे सुध्दा त्याचे अन्न आहे.
**आवाज :** दयाळ पक्षाचा आवाज सुरेल आहे. तो सकाळी गोड आवाजात गातो. पावसाळ्यात जास्त गातो.
**इतर वैशिष्ट्ये :** दयाळ Robin भारतभर आढळतो. शीळ घालतांना व मादीला आकर्षित करण्यासाठी शेपटी उडवितो.शीळ लांब असते. घरट्याच्या बांधकामाची जबाबदारी नर मादीवर टाकतो. अमळनेर मध्ये दयाळ मंगळ मंदिराच्या झाडीत, शिवाजी बगिच्यात, कॉलेज रेक्टर बंगल्याच्या झाडीत, न्यू प्लॉटमधील बंगल्यांच्या बागेत आढळतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर

# विठ्ठल नगरात १२ एप्रिलला निबंध, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विठ्ठल नगर परिसरात रविवार, दि. १२ एप्रिल रोजी निबंध व वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. जिल्ह्यातील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच सर्व नागरिकांसाठी ही स्पर्धा खुली ठेवण्यात आली आहे. सामाजिक व शैक्षणिक विचारांना चालना देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी "क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले : जीवन व कार्य" तसेच "डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन व कार्य" हे दोन विषय देण्यात आले आहेत. निबंध व वक्तृत्व या दोन्ही स्पर्धांसाठी स्पर्धकांनी एकच विषय निवडायचा आहे. वक्तृत्व स्पर्धेसाठी आठ मिनिटांचा वेळ देण्यात आला आहे. निबंध ८०० ते १ हजार शब्दांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी आकारली जाणार नाही. स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी १ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ७५० रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५०० रुपये अशी रोख बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. वक्तृत्व स्पर्धा रविवार, दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता विठ्ठल नगरातील प्रा. अशोक पवार यांच्या निवासस्थानी (अभ्यासिका) होणार आहे. निबंध स्पर्धेसाठीचे निबंध दि. १० एप्रिल २०२६ पर्यंत पाठवायचे आहेत. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांनी निबंध पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी संयोजक प्रा. अशोक पवार (मो. ९४२२२७८२५६), हृदयनाथ मोरे (मो. ९४२१५१२०८५), प्रा. राहुल निकम (मो. ९८२३२२२६५९) व बापूराव ठाकरे (मो. ९९६०२०९८२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पेट्रोल तुटवड्याच्या अफवेने वाहनचालक 'पॅनिक'

पान १ वरून : वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या होत्या. अनेक ठिकाणी नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. शहराच्या मध्यवर्ती भागातील तसेच काही पंपांवर 'पेट्रोल शिल्लक नाही' असे फलक लावण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये अधिकच संभ्रम निर्माण झाला. या अचानक वाढलेल्या गर्दीचा सर्वाधिक फटका नोकरदार वर्ग आणि विद्यार्थ्यांना बसला. दैनंदिन कामासाठी बाहेर पडणाऱ्यांना उशीर होणे, वाहतूक कोंडी आणि अनावश्यक मानसिक ताण सहन करावा लागला. काही ठिकाणी किरकोळ वादविवादही झाल्याचे समजते. दरम्यान, संबंधित अधिकाऱ्यांनी



नागरिकांना अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन केले आहे. इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. तुटवडा नसून केवळ अचानक वाढलेल्या मागणीमुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगण्यात आले. नागरिकांनी संयम राखून केवळ गरजेनुसारच इंधन खरेदी करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**पंपांवर पेट्रोल उपलब्ध नसल्याच्या अफवेमुळे ग्रामीण भागातील काही किरकोळ दुकानदारांनी कॅन तसेच बिसलरीच्या बाटल्यांमध्ये पेट्रोल साठवून ठेवले आहे. या परिस्थितीचा फायदा घेत ग्रामीण भागातील काही व्यावसायिक अनधिकृतपणे सुमारे १५० रुपये प्रतिलिटर दराने पेट्रोलची विक्री करत आहेत. त्यामुळे किरकोळ विक्रेत्यांची चांगलीच 'चांदी' होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

## आजचे अभीष्टचिंतन





श्री.डॉ. शशिकांत सोनार
अमळनेर



श्री.सुशिल भदाणे
अमळनेर



श्री. सुनिल पाटील
अमळनेर



श्री. गौरव शहा
अमळनेर



श्री.अनिकेत घोरपडे
अमळनेर



सौ. विशाखा कुडे (धमणे)
अमळनेर

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ‘अरे भावा... जे तू बोलतोय, ते तुला तरी समजते का?’

## पहाटे अमिताभ बच्चन यांचे ट्विट कुणासाठी? चाहते कोड्यात


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडचे बिग बी अर्थात अमिताभ बच्चन यांनी एक काळ आपल्या चित्रपटातून तुफान गाजवला. रिॲलिटी शोमधूनही त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. ८३ वयातही बिग बी सोशल मीडियात प्रचंड ॲक्टिव्ह असतात. (ट्विटर) एक्सवर आपले पोस्ट आणि विचार मांडत असतात. त्यांचे ट्विट्स म्हणजे जणू एक कोडेच. चाहते तसेच नेटकऱ्यांना कायम विचारात पाडतात. अलीकडेच अमिताभ बच्चन यांनी एक ट्विट आपल्या एक्स अकाऊंटवर शेअर केली आहे. त्यांनी शेअर केलेल्या ट्विटने अनेकांना विचारात पाडले आहे. त्यांनी शेअर केलेली ट्विट एक कोडेच बनले आहे. जे कुणीही समजू शकलेले नाही. नेटकऱ्यांनी या ट्विटवर कमेंट करत प्रश्नांचा भडिमार केला आहे. अमिताभ बच्चन यांनी नेमके काय ट्विट केले आहे पाहूया...

अमिताभ बच्चन एक्सवर सक्रिय असतात. पण त्यांनी केलेले ट्विट हे कायम कोड्यात टाकतात. त्यांच्या ट्विटवर एक नंबर देखील आपल्याला पाहायला मिळतो. आज पहाटे ३:४१ मिनिटांनी अमिताभ बच्चन यांनी एक ट्विट आपल्या एक्स अकाऊंटवर शेअर केली. त्यांनी आपल्या ट्विटमध्ये लिहिले, की ‘टी-५६८७, अरे भावा... जे तू बोलतोय, ते तुला तरी समजते का?’. अमिताभ बच्चन यांनी नेमके कुणाला उद्देशून हे ट्विट शेअर केले, हे अद्याप कुणालाही समजू शकलेले नाही.

अमिताभ बच्चन यांचे ट्विट सोशल मीडियात तुफान व्हायरल झाले. नेटकऱ्यांनी या पोस्टवर रिॲक्शन दिले. तसेच कमेंट करत काही प्रश्न देखील उपस्थित केले आहेत. एकाने लिहिले, की ‘अहो काका, आता झोपा...सकाळी-सकाळी कशाला कोडे सोडवत आहात’. तर एका नेटकऱ्याने अगदी मिश्कीलपणे ट्विटला रिप्लाय दिला आहे. ‘अमितजी, तुम्ही या गोष्टी थेट तुमच्या पत्नीला सांगू शकता. पहाटे ३ वाजता कोण ट्विट करतो?’ तर आणखी एका युझरने, ‘अमितजी रात्र झाली आहे. तुम्हाला झोप नाही येत का? एवढ्या रात्री तुम्ही कुणाला समजावून सांगत आहात?’, असा ट्विटला रिप्लाय दिला आहे. तर आणखी एका युझरने, ‘आम्ही देखील तुम्हाला तोच प्रश्न विचारून थकलो आहोत’. तर नेटकऱ्याने थेट अमिताभ बच्चन यांच्यासमोर प्रश्न उपस्थित केला आहे. ‘हा प्रश्न आमचाही आहे, तुम्ही जे काही लिहिले आहे, ते तुम्हाला तरी समजते आहे का सर?’.


दरम्यान, अमिताभ बच्चन यांनी नेमके ट्विट कुणाला उद्देशून केले होते? ट्विट करण्यामागचे कारण काय? असे अनेक प्रश्न सध्या अजूनही अत्तुरीत आहेत.



# वारंवार विसरता का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल अनेकांमध्ये छोट्या-छोट्या गोष्टी विसरण्याची समस्या वाढताना दिसते. लोकांची नावे, रोजची कामे किंवा साध्या गोष्टीही आठवत नाहीत, अशी तक्रार अनेकजण करत आहेत. यामागे केवळ चुकीची जीवनशैली किंवा आहार कारणीभूत नसून वाढते वायूप्रदूषणही एक मोठे कारण असल्याचे नव्या संशोधनातून समोर आले आहे. वैज्ञानिकांच्या मते वायूप्रदूषणाचा परिणाम फक्त फुफ्फुसांवर किंवा हृदयावरच होत नाही, तर तो थेट मेंदूवरही परिणाम करतो. विशेषतः हवेत असलेले सूक्ष्म कण म्हणजेच पीएम २.५ हे अत्यंत धोकादायक ठरत आहेत. हे सूक्ष्म कण मेंदूच्या कार्यावर परिणाम करतात.



प्लस मेडिसीन या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार वाढते वायूप्रदूषण लोकांची स्मरणशक्ती कमी करत आहे. यामुळे पुढे जाऊन अल्झायमर आणि डिमेन्शियासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो आहे. ज्या भागात हवा अधिक प्रदूषित आहे तेथे राहणाऱ्या लोकांमध्ये या समस्या अधिक प्रमाणात दिसून येत आहेत.

यापूर्वी वायूप्रदूषण हे मुख्यतः श्वसनाच्या आजारांशी संबंधित मानले जात होते. पण आता संशोधनातून स्पष्ट झाले आहे, की प्रदूषित हवा मेंदूतील स्मरणशक्ती साठवण्याची क्षमता आणि विचार प्रक्रियेशी संबंधित मज्जातंतूंवरही परिणाम करते. त्यामुळे मानसिक आरोग्यावरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो. या अभ्यासात २००० ते २०१८ या कालावधीत ६५ वर्षांवरील सुमारे २.७८ कोटी लोकांच्या आरोग्याची माहिती तपासण्यात आली. त्यातून असे आढळले, की जे लोक दीर्घकाळ पीएम २.५ च्या संपर्कात होते त्यांच्यात स्मरणशक्ती कमी होणे आणि विचारक्षमता घटणे यासारख्या समस्या जास्त प्रमाणात आढळल्या. जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) नुसार हवेत पीएम २.५ चे प्रमाण एका मर्यादेपेक्षा जास्त नसावे. मात्र भारत, चीन आणि आफ्रिकेतील अनेक भागांमध्ये हे प्रमाण सुरक्षित मर्यादेपेक्षा खूप जास्त आहे. त्यामुळे या देशांमध्ये राहणाऱ्या लोकांना मेंदूशी संबंधित आजारांचा धोका अधिक असल्याचं सांगितले जात आहे. विशेष म्हणजे ज्यांची मेंदूची क्षमता आधीच कमी आहे किंवा वृद्ध व्यक्ती आहेत त्यांच्यासाठी प्रदूषित हवा अधिक घातक ठरू शकते. अशा लोकांमध्ये अल्झायमर आणि डिमेन्शिया यांसारख्या आजारांची शक्यता अधिक वाढते.

एकूणच वाढते वायूप्रदूषण ही केवळ पर्यावरणाची समस्या नसून ती आपल्या मेंदूच्या आरोग्यासाठीही मोठा धोका ठरत आहे. त्यामुळे स्वच्छ हवा, योग्य आहार आणि आरोग्यदायी जीवनशैली याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.



# सेना के मेजर ने कैप्टन से की शादी

## दहेज में लिया सिर्फ ₹१ और नारियल, दिल छू लेगी ये कहानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

समाज में दहेज प्रथा की जड़ों को हिला देने वाली एक अनूठी शादी इन दिनों सहारनपुर में चर्चा का विषय बनी हुई है। यहां एक फौजी परिवार ने परंपराओं से ऊपर उठकर संस्कारों को अहमियत दी और बिना किसी भारी-भरकम लेन-देन के विवाह संपन्न कराया।

### ₹१ और नारियल में संपन्न हुआ विवाह

ग्राम मीरपुर निवासी चौधरी ओमपाल सिंह (रिटा. सैनिक) के पुत्र मेजर मधुर चौधरी का विवाह ब्रजमंडल की कैप्टन ज्योति सौरोत के साथ हुआ। इस हाई-प्रोफाइल शादी की सबसे खास बात यह रही कि दूल्हे पक्ष ने वधू पक्ष से केवल एक रुपया और एक नारियल बतौर शगुन स्वीकार किया।

### ‘बहू ही हमारी सबसे बड़ी लक्ष्मी है’

**सक्सेस स्टोरी**

चौधरी ओमपाल सिंह का कहना है कि उनके पास कई प्रतिष्ठित परिवारों से रिश्ते आए थे, लेकिन उन्होंने दहेज रहित शादी का संकल्प लिया था। वहीं, उनकी पत्नी ने भावुक होते हुए कहा, ‘धन-दौलत तो आती-जाती रहती है, लेकिन एक संस्कारी बेटी ही दो परिवारों को जोड़ने वाली असली लक्ष्मी होती है.’

### बचपन की एक खबर ने बदली सोच

मेजर मधुर चौधरी ने इस फैसले के पीछे की अपनी व्यक्तिगत कहानी साझा की। उन्होंने बताया कि जब वे स्कूल में थे, तब अखबारों में दहेज के कारण टूटने वाले रिश्तों और प्रताड़ना की खबरें उन्हें विचलित कर देती थीं। स्कूल के दिनों में ही मधुर ने तय कर लिया था कि जब वे एक बड़े अधिकारी बनेंगे, तो दहेज मुक्त विवाह करेंगे। मेजर बनने के बाद जब उन्होंने अपने इस संकल्प को परिवार के सामने रखा, तो माता-पिता ने बिना किसी हिचकिचाहट के उनका समर्थन किया।

### युवाओं के लिए एक मजबूत संदेश

मेजर मधुर ने देश के युवाओं से अपील की है कि वे अपने माता-पिता के संस्कारों का सम्मान करें और समाज में सकारात्मक बदलाव लाने के लिए साहस दिखाएं। आज यह विवाह न केवल सरसावा क्षेत्र में, बल्कि पूरे उत्तर प्रदेश में दहेज प्रथा के खिलाफ एक प्रेरणादायक उदाहरण बन गया है।

# सराव सत्रात एकही मिनीट वाया घालवू नका

## रनमशीन विराट कोहलीचा आरसीबी सहकाऱ्यांना मोलाचा सल्ला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या हंगामाला सुरूवात होण्यापूर्वी, विद्यमान विजेता संघ ‘रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू’ने (आरसीबी) कंबर कसली आहे. शनिवारी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सराव सत्रात संघाचा आधारस्तंभ विराट कोहलीने आपल्या सहकाऱ्यांना पूर्णपणे सज्ज’ होण्याचे आवाहन केले. गतवर्षी मिळवलेल्या पहिल्या विजेतेपदाचे रक्षण करणे हे मोठे आव्हान असून, सरावाचा एकही क्षण वाया घालवू नका, असा कडक संदेश कोहलीने यावेळी दिला.

गेल्या वर्षी १८ वर्षांचा प्रदीर्घ दुष्काळ संपवून आरसीबीने पहिले विजेतेपद पटकावले होते. त्या यशाचा संदर्भ देत कोहली म्हणाला, गेल्या वर्षी आपण जे यशाचे शिखर गाठले, त्यासाठी मागील दोन-तीन हंगामात प्रचंड मेहनत घेतली होती. मात्र, आता हे आव्हान अधिक कठीण होणार आहे. आपण चॅम्पियन असल्याने इतर सर्व संघ आपल्याविरुद्ध दुप्पट ताकदीने मैदानात उगुरतील. त्यामुळे आपल्याला इतरांच्या किमान एक पाऊल पुढे राहावे लागेल. पहिल्या दिवसापासूनच १२० टक्के योगदान देण्यावर विराटने भर दिला.

मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांनी लिलावानंतर तयार झालेल्या नवीन संघाबद्दल समाधान व्यक्त केले. यंदा आरसीबीने आपल्या संघात व्यंकटेश अय्यर, मंगेश यादव, जॉर्डन कॉक्स, विकी ओस्तवाल व सात्विक देसवाल यांसारख्या खेळाडूंचा समावेश केला आहे. फ्लॉवर म्हणाले की, ‘आमच्या जर्सीवर आता विजेतेपदाचा ‘स्टार’ आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे. परंतु, तो इतिहास झाला. आता नवीन खेळाडूंना आरसीबीच्या कार्यपद्धतीशी’ जोडून घेत पुन्हा एकदा जेतेपदावर नाव कोरणे हे आमचे ध्येय असल्याचे ते म्हणाले.

### घरच्या मैदानावर मोहिमेची सुरूवात

आरसीबी आपल्या मोहिमेची सुरूवात २८ मार्च रोजी घरच्या मैदानावर सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध करणार आहे. घरच्या प्रेक्षकांचा पाठिंबा आणि मैदानाची स्थिती पाहता सुरूवातीलाच ‘मोमेंटम’ मिळविणे सोपे जाईल, असा विश्वास प्रशिक्षकांनी व्यक्त केला. यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्मानेही सराव सत्रातील सकारात्मक वातावरणाबद्दल आनंद व्यक्त केला. विराट कोहलीचा अनुभव आणि नवीन खेळाडूंची जिद्द यांच्या जोरावर आरसीबी यंदा ‘बॅक टू बॅक’ विजेतेपद मिळविण्यासाठी सज असल्याचे चित्र दिसत आहे.



# सिंगापुरातील अनोखी इमारत



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सिंगापूरपासून अवघ्या वीस मिनिटांच्या अंतरावर एक नवी गृहबांधणी योजना आकारास आली आहे. या इमारतीची वास्तू रचना मोशे सॅफदी या आर्किटेक्टने केली आहे. सॅफदी यांना सिंगापूरमधील मरीना बे सॅन्डस् रिसॉट नावाची प्रसिद्ध इमारत बांधली आहे. आता त्यांनी स्काय हॅबिटॅट नावाच्या ३८ मजली उत्तुंग इमारतीचे डिझाईन तयार केले आहे. या प्रकल्पामध्ये ५०९ अपार्टमेंट असणार आहेत. सिंगापूरमधील उच्च मध्यम वर्गीयांसाठी ही इमारत बांधण्यात येत आहे. या इमारतीचे डिझाईन अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. दगडांची जशी उत्तरंड असते, त्या पद्धतीने या इमारतीचे डिझाईन अत्यंत आकर्षक पद्धतीने तयार करण्यात आले आहे. हे करताना इमारतीच्या सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे. दोन टॉवर ब्लॉकमध्ये ही इमारत उभी राहात आहे. या दोन टॉवर ब्लॉकना जोडण्यासाठी तीन पुल बांधण्यात आले आहेत. दोन्ही टॉवरमधील खालचे भाग है सरक्युलेशन रूट प्रमाणे तयार करण्यात आले आहेत. वरच्या भागात स्विमिंग पुल तयार करण्यात आला आहे. या स्विमिंग पुलवरून संपूर्ण सिंगापूरचे विहंगम दृश्य पाहावयास मिळते. इमारतीच्या तळाशी गार्डन वगैरे सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर तळाशीही स्विमिंग पुल तयार करण्यात आला आहे. या इमारतीचे बांधकाम २०१६ मध्ये पूर्ण झालेली आहे.

















# समर्थ रामदास स्वामी जयंती विशेष

## राष्ट्रधर्म व अध्यात्माचा संगम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



महाराष्ट्राच्या संतपरंपरेत समर्थ रामदास स्वामी यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांची २६ मार्च रोजी जयंती. दरवर्षी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे स्मरण करून समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला जातो. रामभक्ती, राष्ट्रप्रेम आणि समाजजागृती यांचा सुंदर संगम त्यांच्या जीवनकार्यामध्ये दिसून येतो.

समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म २६ मार्च १६०८ रोजी जांब (जि. जालना) येथे झाला. त्यांचे मूळ नाव नारायण असे होते. बालपणापासूनच त्यांना अध्यात्माची ओढ होती. केवळ १२ व्या वर्षी त्यांनी घर सोडून भगवान प्रभू श्रीरामचंद्र यांच्या नामस्मरणात स्वतःला वाहून घेतले.

### अध्यात्म व समाजकार्य

रामदास स्वामींनी केवळ वैयक्तिक साधना न करता समाजप्रबोधनाला विशेष महत्त्व दिले. त्यांनी देशभर भ्रमंती करून लोकांना नैतिकता, शौर्य आणि संघटनेचे महत्त्व पटवून दिले. त्यांच्या विचारांत 'बल, बुद्धी आणि भक्ती' यांचा त्रिवेणी संगम दिसतो.

### छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंध

समर्थ रामदास स्वामी हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे आध्यात्मिक मार्गदर्शक होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याला त्यांनी नैतिक आणि आध्यात्मिक पाठबळ दिले. त्यांच्या प्रेरणेने स्वराज्याच्या कार्यात नवे बळ संचारले.

### साहित्यनिर्मिती

रामदास स्वामींनी अनेक ग्रंथांची निर्मिती केली. त्यातील दासबोध हा ग्रंथ अत्यंत प्रसिद्ध आहे. यामध्ये जीवनशैली, राजकारण, समाजकारण आणि अध्यात्म यांचे सखोल मार्गदर्शन केले आहे. तसेच 'मनाचे श्लोक' हेही त्यांचे महत्त्वपूर्ण साहित्य आहे, जे आजही लोकांना प्रेरणा देतात.

### समाजावर प्रभाव

रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या मठ-समाजसंस्थांमुळे समाजात संघटन आणि नैतिकतेची भावना वाढीस लागली. त्यांनी हनुमान मंदिरांची स्थापना करून तरुणांमध्ये शौर्य आणि बलशक्तीची जाणीव निर्माण केली.

### आजच्या काळातील महत्त्व

आजच्या धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनात रामदास स्वामींचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांनी दिलेले संयम, शिस्त, राष्ट्रप्रेम आणि आत्मविश्वासाचे धडे आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक आहेत. रामदास स्वामींची जयंती हा केवळ स्मरणाचा दिवस नसून त्यांच्या विचारांचे आचरण करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. त्यांच्या शिकवणीप्रमाणे जीवन जगले, तर व्यक्ती आणि समाज दोन्ही अधिक सक्षम आणि सशक्त बनतील.

# अमळनेरमधील श्रीराम मंदिर : श्रीमंत प्रतापशेठजींच्या धार्मिक कार्याचा परिपाक

जळगाव जिल्ह्यातील अमळनेर येथे ऐतिहासिक वास्तू वैभवात भर घालणाऱ्या स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक देखण्या इमारती आहेत. त्यात श्रीमंत प्रतापशेठजी यांच्या 'श्रीराम मंदिरा'चा समावेश आहे. हे मंदिर शहरातील उत्तर भागात मारवडकडे जाणाऱ्या रस्त्यावर आणि प्रताप महाविद्यालयाच्या उत्तरेस आहे. अमळनेरच्या इतिहासात ज्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते असे श्रीमंत प्रतापशेठजी या दानशूर, तत्त्वज्ञ, व्यासंगी आणि धार्मिक अशा सत्पुरुषाने हे मंदिर उभारले आहे. मंदिराचा उभारणी काळ सन १९४३ चा आहे. या मंदिर उभारणीसाठी तत्कालीन स्थितीत तीन लाख रुपये खर्च झाल्याची नोंद आढळते.

श्रीराम मंदिर हे श्रीमंत प्रतापशेठजींच्या धार्मिक कार्याचा परिपाक आहे. कोणत्याही कार्याच्या यशस्वितेसाठी भगवंताचा आशीर्वाद हवा असतो.

**सामर्थ्य आहे चळवळीचे। जो जो करील त्याचे।**
**परंतु तेथे भगवंताचे। अधिष्ठान पाहिजे।**

या समर्थ रामदासांच्या उक्तीनुसार शेठजींना त्यांचे आराध्य दैवत प्रभू श्रीरामचंद्रांचे कृपाशीर्वाद नेहमी लाभलेले दिसतात. या श्रीराम मंदिराच्या उभारणीचा इतिहास अवलोकन केला असता पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध होते.

### श्रीराम भक्ती प्रेरणा

श्रीमंत प्रतापशेठजींचे वय ७, ८ वर्षे असताना त्यांना चोपड्याला आणले. तेथे माणकचंद रतीरामशेठ या नावाचे सावकार, धनाढ्य व्यापारी होते. त्यांना मूलबाळ नसल्याने त्यांनी राजस्थानातील कालाडेरा येथे जन्मलेल्या प्रतापला फाल्गुन वद्य २ सवंत १९४६ ला दत्तक घेतले. त्यांचे नाव 'मोतीलाल' असे ठेवण्यात आले. हा साधारण सवंत १९५० चा काळ. तेथेच प्रताप शेठजींना चौथीपर्यंत शिक्षण मिळाले. पुढे ते व्यवसायात लक्ष घालू लागले. त्यांना लहानपणीच धार्मिक व पौराणिक पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. त्यांच्या जीनमध्ये शिपाई पहारेकरी होते. त्यातील काही पहारेकरी हे उत्तर भारतीय पूर भैय्या होते. पहाटेच्या वेळी हे शिपाई तुलसीदासकृत तुलसी रामायणाचे वाचन करीत. त्यांची वाचण्याची शैली, लय आकर्षक होती. त्या रामायणातील चौपाळींचे शब्द व त्याचे अर्थ कळाल्याने प्रताप शेठजींना तुलसी रामायणाची गोडी लागली. त्यांनी त्यांच्या वडिलांच्या हयातीतच तुलसी रामायणाची मोठ्या टाईपची एक प्रत रक्कम रुपये आठची त्यावेळी पोस्टाद्वारे मागविली. तसा त्यांचा ओढा धार्मिकतेकडे आणण्यात गुरुवर्य सावळाराम मास्तर यांची शिकवण जास्त कारणीभूत होती. सावळाराम मास्तर हे चोपडा येथील विद्वान गृहस्थ. त्यांचे वेद, उपनिषदांवर प्रभुत्व होते. त्यातून त्यांनी श्रीमंत प्रतापशेठजींना प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यातील भेद समजावून सांगितला. तेव्हा प्रतापशेठजींनी त्यांना सहज विचारले, की 'प्रवृत्ती आणि निवृत्ती' म्हणजे नेमके काय? तेव्हा सावळाराम मास्तर यांनी सांगितले, की 'प्रवृत्ती' म्हणजे व्यवहार आणि 'निवृत्ती' म्हणजे परमार्थ.

'या दोघींपैकी कोणती चांगली?' असा प्रतिप्रश्न प्रतापशेठजींनी केल्यावर सावळाराम मास्तर म्हणाले, की 'निवृत्ती चांगली असली, तर माणसाला व्यवहार सहज चांगला करता येतो.' तेव्हा प्रतापशेठ चटकन म्हणाले, की 'मला मग निवृत्तीच शिकवा.' तेव्हापासून त्यांच्या आध्यात्मिक शिक्षणाला सुरूवात झाली. सावळाराम मास्तरांनी त्यांना धार्मिक ग्रंथ, रामायण, महाभारत, एकनाथी भागवत अशा ग्रंथांची ओळख करून दिली. त्यानंतर प्रतापशेठजींनी अद्वैत तत्त्वज्ञानाचे अभ्यासक म्हणून कार्य केले. देशभरातील विद्वान, तत्त्वज्ञ यांच्याशी त्यांचा विचारविनिमय चालत असे. त्यांनी स्वतः काही तत्त्वज्ञानविषयक पुस्तकेही लिहिली. तसेच तत्त्वज्ञानावर व्याख्याने दिली. त्यांनी 'जग मिथ्या की पुरुषोत्तम रूप?' आणि 'भगवद्‌गीतेची गुरुकिल्ली' हे ओवीबद्ध ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. आद्य शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान अभ्यासण्यासाठी त्यांनी



तत्त्वज्ञान मंदिर म्हणजेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ फिलॉसॉफीची स्थापना देखील केली. ही संस्था पुढे जगभर मान्यता पावली.

'जग मिथ्या की पुरुषोत्तम रूप?' या त्यांच्या ओवीबद्ध ग्रंथात प्रभू श्रीरामचंद्रांचे सर्वस्पर्शी अस्तित्व कसे आहे? हे सांगताना त्यांनी-

**शरीर असे रामाचे। ते रूप असे पुरुषोत्तमाचे।**
**परि तेथे देह भावाचे। भान असेना ॥१५९॥**
**रामाचे शरीर अतिसुंदर। ते स्वतः असे खुदा का नूर।**
**तया बाह्यत्व आणिती कातर। परोक्षत्वे ॥१५७॥**

### श्रीराम मंदिराची स्थापना

श्रीमंत प्रतापशेठजींनी अमळनेरला श्रीराम मंदिर उभारण्याचे ठरवून तसा संकल्प केला. त्यानंतर श्रीराम मंदिर उभारण्यासंदर्भात योजना आखली. या मंदिरासाठी प्रभू श्रीरामचंद्र, लक्ष्मण, माता सीता आणि हनुमानजी यांच्या विलोभनीय मूर्ती घडविण्यात आल्या. त्यासाठी शेठजींचे स्नेही औंधचे स्व. राजेसाहेब यांनी इटलीहून उत्तम पांढराशुभ्र संगमरवरी दगड मागविला व स्वतःच्या निगराणीखाली कारागीरांकडून सुबक मूर्ती घडवून घेतल्या. या मूर्तींची प्रतिष्ठापना मंदिरात केली. त्या काळी पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश या दोन्हीही ठिकाणी अशा स्वरूपाचे अतिशय भव्य व आधुनिक पद्धतीचे श्रीराम मंदिर नव्हते. त्यामुळे हे मंदिर कमी कालावधीत ख्यातीप्राप्त बनले. या मंदिराने आता ८२ वर्षे पूर्ण केली आहेत. या श्रीराम मंदिरात निरंतर धार्मिक कार्यक्रम सुरू असतात.

दरवर्षी चैत्र महिन्यात नऊ दिवस कीर्तन असते. श्रीराम नवमीच्या दिवशी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्रीराम जन्मसोहळा साजरा होतो. याशिवाय हनुमान जयंती, महाशिवरात्र, आद्य शंकराचार्य जयंती अशा प्रकारचे उत्सवही पार पडतात. महाशिवरात्रीला रुद्राभिषेक होतो. श्रावण मासात लघुरुद्र होतो. दर एकादशीला अभिषेक, पूजा, आरती असते. दर पौर्णिमेला गायत्रीमातेचे होमपूजन होते. दररोज सकाळी ८.३० वाजता काकड आरती आणि सायंकाळी ७.३० वाजता आरती होते. त्यावेळी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित असतात.

### श्रीराम मंदिर वैभवी वास्तू ठेवा

या मंदिरात जायला दोन प्रवेशद्वार असून, ती रस्त्याला समांतर आहेत. एक द्वाराने मंदिराचे पूर्वेकडील मुख्य प्रवेशद्वाराकडे जाता येते, तर दुसऱ्या द्वाराने मंदिराच्या मागील बाजूस जाता येते. मंदिर साधारणपणे सहा फूट उंचीच्या चौथऱ्यावर उभारलेले आहे. मंदिराची रचना पूर्वाभिमुख असून, उंची दुमजली इमारतीसारखी आहे. आत विशाल सभामंडप मध्यवर्ती भागात आहे. मंदिराला सुमारे पन्नास फूट उंचीची तीन शिखरे आहेत. त्यावर कळस आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारावर लाकडी चौकट असून त्यावर महिरपी कोरीवकाम आहे. बांधकाम शैली राजस्थानी दिसून येते. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रभू श्रीरामचंद्र, माता सीता आणि लक्ष्मण यांच्या मूर्ती विराजमान आहेत. त्यांचे सन्मुख सभामंडपात आद्य शंकराचार्य यांचा बैठा पुतळा आहे. समोरच्या भागात श्रीरामभक्त महाबली हनुमानजी यांची वानर रूपातील प्रतिमा आहे. या प्रतिमेचे लक्ष गाभाऱ्यातील श्रीराम, लक्ष्मण व माता सीता यांच्या मूर्तीकडे असल्याचे स्पष्ट दिसून येते. मंदिर पूर्णपणे खासगी मालमत्ता असून, सध्या त्याचे व्यवस्थापन प्रतापशेठजी यांचे कायदेशीर वारस यांच्याकडे आहे. मंदिराच्या आतील भागात सुंदर चित्रे काढून सुशोभीकरण केलेले आहे. ही चित्रे नयनरम्य अशा रंगसंगतीत रंगविलेली आहेत.

या मंदिराचे यथोचित वर्णन करणारी एक कविता प्रस्तुत लेखकाच्या हाती लागली. प्रतापशेठजींच्या अमृत महोत्सव दिनानिमित्त प्रसिद्ध केलेल्या गौरव ग्रंथात ती उपलब्ध आहे. कवी विष्णू रामचंद्र बेंद्रे रि.सा.ई जळगाव पूर्व खानदेश यांनी खालील कविता लिहिली आहे.

श्रीराम मंदिर

प्रताप नगरी श्रीरामाचे मंदिर
मनमोहक ।
संनिध विद्या, आरोग्य-भवने,
शोभा नैसर्गिक ॥१॥

प्रातःकाळी तास, कोकिळा शुक
स्वैरघुमती ।
फुले फलांतून मधुरस शोषूनी
स्वानंदे डुलती ॥२॥

सभोवताली, बागबगीच्या,
वृक्ष सान थोर ।
वेल मंडपी, छाया नारळी,
आंत हरीण मोर ॥३॥

राम मंदिरी दिव्य रूप,
श्री सिताराम मूर्ती ।
ध्यान निरखीतां अंतकरणी,
क्षणी तल्लीन स्फूर्ती ॥४॥

पतिव्रता सति सीता संनिध
लक्ष्मणकरि बाण ।
बलभीम उभा कर जोडूनी
नमी लवून मान ॥५॥

स्फूर्तीदायक दिव्य कांतीचे,
ध्यान रामरूप।
हृदयांतरीची ज्योत पाझरे,
स्वयं ज्ञानस्वरूप ॥६॥

जणू बोल तो चैतन्याचा,
वदनावरी भास।
दर्शणार्थी भाविक जनांशी,
व्यर्थचि आभास ॥७॥

बोल खूण ही चैतन्याची,
जाण तोच संत।
ज्ञानाभावी अजाण ज्ञाता
मनी करी खंत ॥८॥

आचार्य मुनी श्री शंकरजी,
जपी राम नाम।
मंदिरगाभी जणू तयांचे,
मंगल निजधाम ॥९॥

श्री शंकरजी सती पार्वती;
गणपती विघ्नहरी ।
लक्ष्मीलंकृत देवी सरस्वती;
दर्शन मुखद्वारी ॥१०॥

मुखद्वारावरी बोल चौघडा;
सुमधुर सुरताल।
मृदंग, वीणा, झांजा भजनी
व्यय भक्ती काल ॥११॥

चातुर्य कला, नक्षी वेली,
दृष्य प्रगट दारी।
मंदिरभागी कुतुहल आणि
प्रसन्नता भारी ॥१२॥

गजपादाकृती स्तंभावरती,
सुंड शीर्ष आधार।
तुंड विकासी दंत शुभकुची
हस्तिदंत साधार ॥१३॥

गजमुख फाटा ' रं ' काराकृति
हस्तिदंत काना।
सुंड मुरडुनी ' म ' कार जोडा
'राम' येईल ध्याना ॥१४॥

हंड्या, झुमरें प्रकाश विद्युत
जरी प्रभा छान ।
मोतीलाल, माणिक रत्नांचा
प्रकाश दिपमान ॥१५॥

मंदिरगाभि प्रभा सुवर्णीः
भास रविचंद्र ।
तेज फांकले सभा मंडपी,
सितारामचंद्र ॥१६॥

त्रिकाल पूजा अर्चन आरति
अर्पण रामपदा ।
कथा- कीर्तने पुराण, भजने,
श्रवणी भक्त सदा ॥१७॥

श्रीराम जय राम जय जय राम।

**- भाऊसाहेब देशमुख,**
**अमळनेर**
**मो. : 94203 89541**

# चैत्र नवरात्री अष्टमी व नवमी तिथी नेमकी केव्हा?

## जाणून घ्या कन्या पूजनाचा शुभ मुहूर्त व विधी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



नवरात्रीच्या शेवटच्या दोन दिवशी म्हणजेच अष्टमी व नवमीला उपवास करून कन्या पूजन केले जाते. या दिवशी अनेकजण कुमारिका मुलींना घरी बोलावून त्यांची नवदुर्गाच्या रूपात पूजा करतात व कन्यांना साजशृंगार भेट देतात. त्यामुळे यंदा अष्टमी व नवमी तिथी केव्हा आहे व कन्या पूजनाचा शुभ मुहूर्त काय हे जाणून घेऊया.

चैत्र नवरात्रीची काही दिवसात सांगता होईल. चैत्र नवरात्रीच्या अष्टमी व नवमीला अनेकजण उपवास करतात व या दिवशी कन्यापूजन देखील केले जाते. ज्यांच्या घरी नवरात्रीचे घट बसतात किंवा देवीची नऊ दिवस विधिवत पूजा केली जाते अथवा जे कोणी देवीचे अखंड नऊ दिवसांचे व्रत करतात ते अष्टमी किंवा नवमीला कुमारिका मुलींना घरी बोलावून भोजन करवतात. कन्या पूजनाला धार्मिक महत्त्व आहे. असे म्हणतात की देवी दुर्गा कुमारिका मुलींच्या रूपात आपल्या घरी येऊन भोजन करते व आशीर्वाद देते. त्यामुळे या कन्यांचे पाय धुवून पूजन केले जाते. तसेच त्यांना साज शृंगाराचे सामान भेट देण्यात येते. भोजन झाल्यानंतर कन्यांना नमस्कार करून त्यांना प्रसन्न मनाने पाठविले जाते. मात्र यंदा नवमी तिथी दोन दिवस असल्याने थोडा संभ्रम निर्माण झाला आहे. चला तर मग पाहूया चैत्र नवरात्रीची अष्टमी व नवमी केव्हा आहे तसेच कन्यापूजनाचा शुभ मुहूर्त काय?

### अष्टमी व नवमी तिथी

अष्टमी गुरुवार, २६ मार्च २०२६

नवमी शुक्रवार, २७ मार्च २०२६

### चैत्र नवरात्री अष्टमी तिथी

पंचांगानुसार अष्टमी तिती बुधवार, २५ मार्चला दुपारी १ वाजून ५१ मिनिटांनी प्रारंभ होऊन दुसऱ्या दिवशी २६ मार्चला सकाळी ११ वाजून ४९ मिनिटांनी समाप्त होईल. अशातच उदय तिथीनुसार गुरुवार, २६ मार्च २०२६ रोजी चैत्र नवरात्रीची अष्टमी तिथी साजरी होईल. अष्टमीला कन्यापूजन करणाऱ्या लोकांनी या दिवशी कन्याभोजन करावे.

### चैत्र नवरात्री नवमी तिथी

नवमी तिथीचा प्रारंभ २६ मार्च सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी होईल व नवमी तिथी २७ मार्चला सकाळी १० वाजून ०८ मिनिटांनी समाप्त होईल. त्यामुळे उदय तिथीनुसार नवमी पूजन शुक्रवार, २७ मार्च रोजी केले जाईल.

### कन्या पूजन शुभ मुहूर्त

अष्टमी तिथी गुरुवार, २६ मार्च २०२६ सकाळी ११ वाजून ४९ मिनिटांपर्यंत.

नवमी तिथी शुक्रवार, २७ मार्च २०२६ सकाळी १० वाजून ०८ मिनिटांपर्यंत.

# श्रीराम नवमीच्या शुभ संयोगावर शुक्र गोचर

## 'या' राशींना मिळणार अपार लाभ, सुख- समृद्धी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीराम नवमीच्या शुभ संयोगावर शुक्र गोचर मेष राशीत होणार आहे. लक्झरी, पैसा, सौंदर्य देणारा शुक्र येत्या २६ मार्च रोजी मेष राशीत प्रवेश करेल. जिचा स्वामी मंगळ आहे. शुक्र मेष राशीत १९ एप्रिलपर्यंत असेल. या काळात शुक्र अश्विनी नक्षत्राच्या पहिल्या चरणात प्रवेश करेल. शुक्र गोचरमुळे मेषसह काही राशींना अत्यंत लाभ होताना दिसतो आहे. पाहूया कोणत्या आहेत या लकी राशी.

शुक्र गोचर मेष राशीत रामनवमीच्या शुभ संयोगावर होईल. येत्या २६ मार्च रोजी शुक्र मंगळाच्या राशीत म्हणजेच मेषमध्ये गोचर करेल. या दिवशी शुक्र सकाळी ५ वाजून ०८ मिनिटांनी मेष राशीत प्रवेश करेल. यावेळी शुक्र अश्विनी नक्षत्राच्या प्रथम चरणात मेषमध्ये गोचर करेल. शुक्र १९ एप्रिलपर्यंत मेष राशीत असेल. हे गोचर प्रेम आणि पैशांशी संबंधित गोष्टींवर प्रभाव टाकेल. काही राशींना शुक्र गोचरचा लाभ होणार आहे. वैयक्तिक आयुष्य ते करिअर सर्व बाबतीत या राशींना फायदा होताना दिसेल. ज्योतिषांकडून जाणून घेऊया की शुक्र गोचरचा कोणत्या राशींना लाभ मिळेल.

### मेष राशीवर प्रभाव



या राशीच्या प्रथम भावात शुक्र गोचर होणार आहे. यामुळे तुमच्या फायनान्समध्ये वृद्धी होईल. तुमचा आत्मविश्वास वाढताना दिसेल. तुमच्या प्रेमजीवनासाठी देखील हे गोचर लाभदायक ठरेल. काहीजण नवीन नात्यात येतील तर काही जुन्या नात्यात नव्याने सुरुवात करतील. व्यवसायात तुम्हाला मानसन्मान व फायदा देखील मिळेल. काहींना लग्नाचे चांगले प्रस्ताव येतील.

उपाय : शुक्रवारी तांदूळ किंवा पांढरी मिठाई दान करा.

### कर्क राशीवर प्रभाव



शुक्र गोचर कर्क राशीच्या दहाव्या भावात होणार आहे. यामुळे तुमचा पूर्ण फोकस करिअर आणि सामाजिक प्रतिमेवर असेल. या काळात तुम्ही कामात थोडे व्यस्त असाल. हे गोचर सरकारी कामे, मीडिया, फॅशन आणि कला क्षेत्रातील लोकांसाठी लाभदायक ठरेल. या काळात तुमचे नोकरीत प्रमोशन होऊ शकते. करिअरमध्ये प्रगतीची दाट शक्यता आहे. तुमच्या कुटुंबाचा मानसन्मान वाढेल.

उपाय : शुक्रवारी देवी लक्ष्मीला फुले आणि मिठाई अर्पण करा.

### तूळ राशीवर प्रभाव



या राशीच्या सातव्या भावात शुक्र गोचर होणार आहे. हे गोचर तुमचे नातेसंबंध, विवाह आणि व्यक्तिमत्वाला प्रभावित करेल. याकाळात तुमचे प्रेमजीवन आनंदी असेल. नात्यात नावीन्यता येईल. नवीन नात्याची सुरूवात होईल. तुमच्या मनातील इच्छा याकाळात पूर्ण होतील. मनपसंत जीवनसाथी मिळण्याची शक्यता आहे. मात्र तुम्हाला याकाळात अहंकार टाळण्याचा सल्ला दिला जातोय. व्यावसायिक भागीदारी आणि कायदेशीर बाबींमधून तुम्हाला फायदा मिळेल.

उपाय : शुक्रवारी 'ओम शुं शुक्राय नमः' या मंत्राचा १०८ वेळा जप करा.

# सनातन धर्म में आठ चिरंजीवी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सनातन धर्म में आठ चिरंजीवी (अष्ट चिरंजीवी) माने जाते हैं, जिन्हें वरदान या श्राप के कारण कलयुग के अंत तक जीवित माना जाता है। ये ८ महान आत्माएं हैं। अश्वत्थामा, राजा बलि, वेदव्यास, हनुमान, विभीषण, कृपाचार्य, परशुराम और ऋषि मार्कण्डेय। इन्हें प्रतिदिन याद करने से आयु और आरोग्य की प्राप्ति होती है।

### अष्ट चिरंजीवी के नाम और कारण

१) **हनुमान :** माता सीता से अमरता का वरदान प्राप्त।
२) **परशुराम :** भगवान विष्णु के छठे अवतार।
३) **विभीषण :** भगवान राम से वरदान प्राप्त।
४) **महर्षि व्यास :** वेदों के रचयिता।
५) **अश्वत्थामा :** भगवान कृष्ण द्वारा युगों तक भटकने का श्राप (महाभारत)।
६) **राजा बलि :** भगवान विष्णु ने पाताल लोक का राजा बनाया।
७) **कृपाचार्य :** कौरव-पांडवों के गुरु।
८) **ऋषि मार्कण्डेय :** शिवजी के आशीर्वाद से १६ वर्ष की आयु में अमरता प्राप्त।

इन चिरंजीवियों के अस्तित्व को भारतीय पौराणिक मान्यताओं में विश्वास के साथ जीवित माना जाता है, जो कलियुग में भी धर्म के रक्षक हैं।

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)